# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त यांचे कार्यालय

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/आयुक्त/ 63 /2023-24 दि. 27/10/2023

**आदेश**

**विषय:- इमारत व इतर लोकपयोगी विकासकामांच्या जागेतील (विकासक व मनपा) स्वच्छता तपासणे करिता समिती गठीत करणे.**

दि.16 ऑक्टोबर, 2023 पासून मिरा भाईंदर महानगरपालिकेने **विशेष** शहर स्वच्छता अभियान सुरु केले आहे. पहिल्या टप्यामध्ये दिनांक 16 ते 27 ऑक्टोबर 2023 या कालावधी आपण सर्वांनी शहरात स्वच्छता दौरा केला आहे. या अभियानात सर्व विभागांना त्यांच्या संबंधित कामातील त्रुटी व करावयाच्या सुधारणा बाबत निर्देशित करण्यात आले आहे. त्या निर्देशाप्रमाणे पुढे अंमलबजावणी होत आहे किंवा नाही यावर पर्यवेक्षण करणे आवश्यक असून याकरिता एक **विशेष स्वच्छता तपासणी** समिती गठीत करण्याचे विचारधीन होते.

**त्याअनुषंगाने खालील प्रमाणे समितीचे गठीत करण्यात येत आहे.**

**समितीची रचना:-**

| अ.क्र. | नाव व पदनाम | पद |
|---|---|---|
| 1. | **श्री. संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त** | **अध्यक्ष** |
| 2. | **श्री. सुजित पानसरे, सहा. नगररचनाकार** | **सदस्य** |
| 3. | **श्री. नितीन मुकणे, कार्यकारी अभियंता** | **सदस्य** |
| 4. | **श्रीम. कविता बोरकर, सहा. आयुक्त** | **सदस्य सचिव** |

**समितीची कार्ये:-**

**नगररचना विभाग अंतर्गत**

- इमारत विकासक, विकास कामासाठी लागणारा माल रस्त्यावर न ठेवू देणे.
- विकास कामांची माहिती दर्शविणारे फलक लावणे.
- विकास कामाच्या कार्यस्थळी ग्रीन नेट लावणे.
- विकास कामामुळे निर्माण होणाऱ्या धुळीवर नियंत्रणासाठी धुळ नियंत्रण यंत्र बसविणे.
- विकास काम सुरु असलेल्या कर्मचाऱ्यांना शौचालयाची सुविधा देणे.
- विकास कामासाठी येणाऱ्या गाडयांचे टायर स्वच्छ करण्यासाठीची यंत्रणा उभारणे.
- मोकळया जागेभोवती कुंपण बांधणे. तसेच घातलेले कुंपण पडण्याच्या स्थितीत आहे त्यांची पहाणी करणे.
- आरजी जागेतील अतिक्रमणे, टीडीआर दिलेला आहे परंतु जागा ताब्यात आलेली नाहीत त्याची माहिती.

**बांधकाम विभाग अंतर्गत**

- विकास काम सुरु असलेल्या कामाची माहिती दर्शविणारे फलक.

- काम पुर्ण झाल्यावर डेब्रीज उचलून घेणे.
- विकास कामासाठी आणलेले साहित्य योग्यरित्या न रचल्याने वाहतुकीस अडथळा येणे.
- विकास कामांच्या ठिकाणी बॅरेकेटींग करणे.
- कार्यस्थळी ग्रीन नेट लावणे.
- विकास कामामुळे निर्माण होणाऱ्या धुळीवर नियंत्रणासाठी धुळ नियंत्रण यंत्र बसविणे.
- अदानी व एमटीएनएल कंपनीचे बोर्ड खराब होऊन पडण्याच्या स्थितीत आहेत याची माहिती
- झाडांवर, इलेक्ट्रीक पोल वर कापून ठेवलेल्या वायर इ.
- रस्त्याच्या कामाचा दर्जा व खड्डे तपासणे.

सदर समितीने उपरोक्त बाबींची तपासणी करुन दिनांक १०/११/२३ पुर्वी स्वयंस्पष्ट अभिप्रायासह आयुक्तांकडे अहवाल सादर करावा. यामध्ये कोणतीही बाब दुर्लक्षित होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)**
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

**१) समिती सदस्य (सर्व)**
**२) विभाग प्रमुख/खाते प्रमुख**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**